# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक २४ जुलै, २०२३**

## महसूल व वन विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: सी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०२९, जमीन महसूल**<br>**बाब क्रमांक: २७, रूपये:- ६०,००,००,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे,ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (१) | ५९६६ | १० | बुलढाणा जिल्हा भूमी अभिलेख कार्यालय तसेच मलकापुर व नादूरा तालुक्यातील कामे जमीन सर्वेक्षणची कामे जलद गतीने होणे गरजेचे आहे त्याकरीता भूमी अभिलेख विभागातील आधुनिक यंत्र सामग्री असणे आवश्यक आहे तरी विभाग करिता कोर्स रोव्हर्स कंट्रोलर्स आणि पोस्ट प्रोसेसिंग सॉफ्टवेअर खरेदी करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबात करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे,श्री. राजेश एकडे** |
| (२) | ५९९५ | १० | दर्यापूर आणि अंजनगाव सुरजी तालुक्यातील शेतकऱ्यांचे शेतजमिन मोजणीचे प्रकरणे मोठ्या प्रमाणात प्रलंबीत असणे, शेतजमीन मोजणीचे कामे जलद आणि आधुनिक प्रगत मार्गाने पार पाडण्यासाठी भूमी अभिलेख विभागास अत्याधुनिक उपकरणांची आवश्यकता असणे, परंतु तालुकास्तरावरील भूमीअभिलेख कार्यालयात शेतजमीन मोजणीसाठी आवश्यक उपकरणांची कमी असणे, एकाच उपकरनाद्वारे भूमापक जमीनिचे मोजणी करीत असणे त्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतजमीन मोजणीचे प्रकरण प्रलंबीत असणे, यामुळे शेतकऱ्यांना मोजणीसाठी अनेक महीने वाट पहावी लागत असणे, भूमी अभिलेख कार्यालयास अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध करून देण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: सी-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०६, वनीकरण व वन्यजीवन**<br>**बाब क्रमांक: ३६, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. संजय जगताप** |
| (३) | ५९९० | १० | ता. पुरंदर, जि. पुणे येथील किल्ले पुरंदर, पिंगोरी, वाल्हा, सासवड, काळदरी, दवणेवाडी, मांढर, पांगारे, धनकवडी, चिकणेवाडी, दिवे घाट या परीसरात मागील |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | महिन्यापासून सातत्याने बिबट्या, वाघ, रानडुक्करे असल्याचे निर्दशानास आलेले असणे, सध्या बिबट्या, वाघ मनुष्यवस्तीत राजरोसपणे फिरत असल्याने कोणतीही दुर्घटना / जीवित हानी होण्याअगोदर कारवाई केल्यास शेतीकऱ्यांना शेतीची कामे करताना व जनावरांना डोंगरावर चरावयास नेताना भितीचे वातावरण निर्माण होणार नसणे, वारंवार प्रसारीत होणाऱ्या बातम्या व प्रत्यक्षदर्शी नागरीकांनी केलेल्या तक्रारींचा सहानुभुतीपुर्वक विचार करून पुरंदर किल्ला ते पिंगोरी परीसरात वावरनाऱ्या बिबट्या, रानडुक्करे यांच्या उपद्रवामुळे ग्रामस्थ भयभीत झालेले असून खबरदारी घेण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | ५९९७ | १० | ता.पुरंदर, जि.पुणे येथील मौजे-मांढर येथील खोमणेवस्ती दत्तात्राय भिवा खोमणे यांच्या वासरावर बिबट्याने केलेल्या हल्ल्यात वासरू दगावलेले आहे. तसेच दोन दिवसापुर्वी शिवरी येथील श्री.अंकुश रामचंद्र आर्डे यांच्यावर रानडुक्कराने हल्लाकरून चावा घेतलेला असणे, परंतु आजपर्यंत त्यांना कोणताही नुकसान भरपाई मिळालेली नसणे, त्याप्रमाणे सध्या सर्वत्र भारनियमन असल्याने रात्री-अपरात्री शेतकऱ्यांना कांदा, गहू यासारखी रब्बी हंगामातील पिकांना पाणी देण्याकरीता जावे लागत असल्याने सर्वत्र भितीदायक वातावरण निर्माण झालेले असल्याने आपणाला यापुर्वी कोणतीही दुर्घटना /जीवित हानी होण्याअगोदर कारवाई होणे गरजेचे असून पुरंदर तालुक्यातील बराचसा भाग उंच डोंगराळ असल्याने याठिकाणी वन्य प्राण्याबरोबरच रानडुक्करे, मोर यांचा दिवसेंदिवस वावर वाढल्याने मोठ्या प्रमाणात भुईमुग व इतर पिकांची नुकसान होत असल्याचे घटना वारंवार होत असून शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान व मिळाणारा मोबदला यात बरीच मोठी तफावत असल्याने मोबदला रक्कमेत वाढ होणे गरजेचे असून याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २१ जुलै, २०२३**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) महसूल व वन विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई